मे. **SPSC** पॉवर, खसरा क्र ६७/६ आणि ६७/३, गाव- हिंगणा, तहसील- तुमसर, जि. भंडारा यांच्या रोस्टींग फर्नेसव्दारे मॅगनीज ऑक्साईडचे (ब्राऊनफिल्ड प्रोजेक्ट) २५०० **TPM** उत्पादना करीता आवश्यक पर्यावरण विषयक अनुमतीकरीता जाहीर लोकसुनावणीचे दि. ११/०५/२०२६ वेळ दुपारी १२.३० वाजता चे इतिवृत्त.

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 तरतूदीनुसार मे. **SPSC** पॉवर, खसरा क्र ६७/६ आणि ६७/३, गाव- हिंगणा, तहसील- तुमसर, जि. भंडारा यांच्या रोस्टींग फर्नेसव्दारे मॅगनीज ऑक्साईडचे (ब्राऊनफिल्ड प्रोजेक्ट) २५०० **TPM** उत्पादना करीता आवश्यक पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ११/०५/२०२६ रोजी वेळ दुपारी १२.३० वाजता, प्रकल्प स्थळ खसरा क्र ६७/६ आणि ६७/३, गाव- हिंगणा, तहसील- तुमसर, जि. भंडारा, येथे मा. श्री. गणेश दिघे, उपविभागीय अधिकारी, तुमसर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. अध्यक्षांच्या संमतीने दुपारी १२.३० वाजता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र**-1**).**

## पार्श्वभूमी

मे. **SPSC** पॉवर, खसरा क्र ६७/६ आणि ६७/३, गाव- हिंगणा, तहसील- तुमसर, जि. भंडारा यांच्या रोस्टींग फर्नेसव्दारे मॅगनीज ऑक्साईडचे (ब्राऊनफिल्ड प्रोजेक्ट) २५०० **TPM** उत्पादना करीता पर्यावरण अनुमतिसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी मंडळास पत्र दि. १८/०२/२०२६ अन्वये अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्रं. MPCB/JD.(WPC)/ENV-PH/B-260304-FTS-0303 date.04/03/2026. अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते. मा. जिल्हाधिकारी भंडारा यांनी कार्यालयीन टिप्पणी दि. ०२/०४/२०२६ अन्वये जनसुनावणी घेण्याबाबत स्थळ, व दिनांक यांस मंजुरी प्रदान केलेली होती.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा तथा संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली, व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप लेखी अथवा तोंडी सादर करावयाचे आहेत, त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर, 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक दि. ०९/०४/२०२६ ला दैनिक द हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना तिस दिवसांच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सांगितले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. (**सहपत्र**-2).

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश क्र. MPCB/230/2026-001 I/2262568/2026 dtd. 08/05/2026 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. (**सहपत्र**-3). सुनावणी पूर्वी एकही सुचना प्राप्त झाली नाही तसेच सुनावणी दरम्यान एकही निवेदन प्राप्त झाला नाही.

सदर प्रकल्पाबांबत प्रकल्प धांरकानी सादर केलेली कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

१. मा. जिल्हाधिकारी, भंडारा.
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा.
३. मा. व्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र, भंडारा.
४. उप-विभागीय अधिकारी, तुमसर, जि. भंडारा.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय तुमसर, जि. भंडारा.
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
७. पर्यावरण व वातावरण बदल विभाग, 15 वा माळा, नवी प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, 3 रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
९. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पुर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, हिंगणा, काटेबामनी, टाकला, खापा, हसारा, सालई, ता. तुमसर, जि. भंडारा.

तसेच कार्यकारी सारांश मंडळांचे संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली होती.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा तथा समन्वयक यांनी मे. **SPSC** पॉवर, खसरा क्र ६७/६ आणि ६७/३, गाव- हिंगणा, तहसील- तुमसर, जि. भंडारा यांना सदर प्रस्तावित रोस्टींग फर्नेसव्दारे मॅगनीज ऑक्साईडचे (ब्राऊनफिल्ड प्रोजेक्ट) २५०० **TPM** उत्पादना करीता व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकांचे तांत्रीक सल्लागार यांनी तपशिलवार मराठी मध्ये मे. **SPSC** पॉवर, खसरा क्र ६७/६ आणि ६७/३, गाव- हिंगणा, तहसील- तुमसर, जि. भंडारा यांना सदर प्रस्तावित रोस्टींग फर्नेसव्दारे मॅगनीज ऑक्साईडचे (ब्राऊनफिल्ड प्रोजेक्ट) २५०० **TPM** उत्पादना करीता पर्यावरण व्यवस्थापन योजना, व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास योजना, प्रकल्पाचे फायदे, पर्यावरण व्यवस्थापन योजना- खर्च, इत्यादीबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, किंवा लेखी सादर करावे असे आवाहन केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. अमरसिंह टेंबरे, माजी सरपंच, ग्रा.पं. हिंगणा, ता.तुमसर, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित प्रकल्पाने रितसर परवानग्या घेवून प्रकल्प उभारत आहे. प्रकल्पास आक्षेप नाही. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

**२) श्रीमती. गायत्री रहांगडाले, सरपंच, ग्रा.पं. हिंगणा, ता.तुमसर, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | स्थानिकांना रोजगार दयावा. तसेच पर्यावरणावर धोका होणार नाही याची दक्षता घ्यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रथम रोजगारामध्ये स्थानिकांनाच प्राधान्य दिले जाईल. |
| २ | प्रकल्पाने कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) निधी अंतर्गत गावामध्ये सामाजिक, शैक्षणिक व विकास या | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये |

| | | |
|---|---|---|
| | अटी व शर्ती पुर्ण केल्यास, प्रकल्पास आक्षेप नाही | सामाजिक, शैक्षणिक व विकास कामासाठी रू. ४ लक्ष उपलब्ध करून देण्यात येईल. |

**३) श्री. धनराज अनासे, सरपंच, ग्रा.पं.उसर्रा, ता.तुमसर, जि.भंडारा.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) निधी आजुबाजूच्या गावास दयावा. तसेच स्थानिकांना रोजगार दयावा. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये सामाजिक, शैक्षणिक व विकास कामासाठी रू. ४ लक्ष उपलब्ध करून देण्यात येईल. रोजगारामध्ये स्थानिकांनाच प्राधान्य दिले जाईल. |

**४) श्री. रवि सेलोकर, उपसरपंच, ग्रा.पं. टाकला, ता.तुमसर, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) निधी प्रतीवर्ष प्रत्येक गावांला करावा, जेणेकरुन गांवाच्या विकासाकरीता पुरेसा निधी मिळेल. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये सामाजिक, शैक्षणिक व विकास कामासाठी रू. ४ लक्ष हिंगणा, टाकला, उसर्रा या गावांला उपलब्ध करून देण्यात येईल. |

**५) श्रीमती. सुनिता सेलोकर, उपसरपंच, ग्रा.पं.हिंगणा, ता.तुमसर, जि.भंडारा.**

| | | |
|---|---|---|
| १ | हा प्रकल्प मागील १५ वर्षापासून चांगल्याप्रकारे सुरू आहे. पर्यावरणाचे संरक्षण करावे व वृक्षलागवडीमध्ये सुधारणा करावी. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| २ | स्थानीकांनाच रोजगार दयावा. | |

मा. अध्यक्ष यांनी समारोप प्रंसगी सांगितले की कॉर्पोरेट सामाजिक निधीचा वापर स्थानिक प्रशासनाच्या व ग्रामपंचायतीसोबत चर्चा करुन निधीचा वाटप करण्याबाब निर्णय घेऊ.

आभार प्रदर्शन करुन जनसुनावणी संपली असे जाहीर करण्यात आले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(किशोर पुसदकर)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, भंडारा

( गणेश दिघे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप-विभागीय अधिकारी, तुमसर, ता. तुमसर, जि.भंडारा